NAVJYOT / Vol. XIII / Issue – I ISSN 2277-8063

# समकालीन भारताचे सागरी सुरक्षा विषयक धोरण

**डॉ. अनिल डी. पाटील,** प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख, कला, वाणिज्य अणि विज्ञान महाविद्यालय,गडहिंग्लज. shrianilpatil@yahoo.in 9975586713

---

**प्रस्तावना :**

भारत एक खंडप्राय देश आहे. भारताच्या पूर्व, पश्चिम आणि दक्षिण दिशांना समुद्री सीमा आहेत. त्यामुळे भारताच्या संरक्षण व्यवस्थेमध्ये 'सागरी सुरक्षेला' विशेष महत्त्व आहे. तसेच दहशतवादाचा प्रश्न एक जागतिक समस्या म्हणून ओळखली जाते. या संदर्भात सीमा सुरक्षेचा प्रश्न आधिक गंभीर झाला आहे. प्रत्येक देशाला आपल्या सीमा संरक्षणासाठी आधिक दक्ष रहावे लागत आहे. सहाजिकच समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणात 'सागरी सुरक्षा' प्रत्येक देशाच्या संरक्षणाच्या Ðष्टीने कळीचा मुद्दा ठरत आहे. भारतामध्ये सागरी सुरक्षेकडे पुरेसे लक्ष दिले नसल्याचे जाणवते. त्यामुळे भारताची 'राष्ट्रीय सुरक्षा' धोक्यात आहे. त्याचप्रमाणे भारताचे शेजारील देश चीन आणि पाकिस्तान यांनी भारतच्या सुरक्षेसमोर मोठे आव्हान उभे केले आहे. या संदर्भात भारताची 'सागरी सुरक्षा' या विषयावर चिंतन करणे आवश्यक ठरते.

**उद्देश:**

आंतरराष्ट्रीय राजकारणातील 'सागरी सुरक्षा' ही संकल्पना आभ्यासने आणि भारताच्या सागरी सुरक्षेचा आढावा घेणे हे उद्देश डोळयासमोर ठेवुन या पेपरची मांडणी करण्यात आली आहे. संदर्भग्रंथ, संशोधनपर लेख, वर्तमानपत्रातील लेख, निवडक संरक्षण दलाच्या वेबसाईट यावरून एकत्र केलेल्या माहितीच्या आधारे हा शोधनिबंध तयार करण्यात आला आहे. यासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**संकल्पना :**

'सागरी सुरक्षा' या संकल्पनेच्या अर्थाबाबत एकमत आढळत नाही. इंग्रजीमधील ^Maritime Security` या संकल्पनेचे मराठी भाषांतर म्हणजे 'सागरी सुरक्षा' होय. छुप्या किंवा खुल्या पध्दतीने दहशतवादी कृत्याच्या माध्यमातून होणा—या समुद्री आक्रमणापासून (धोक्यापासून) जाणीवपूर्वक राज्याचे रक्षण करणे म्हणजे सागरी सुरक्षा होय. यात जहाज, बंदर आणि समुद्रावरील सुविधांच्या संरक्षणाचा समावेश होतो.

आंतरराष्ट्रीय सागरी किनाऱ्यांची शांतता आणि सुरक्षा; राज्याच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणे, भौगोलिक अखंडता व राजकीय स्वातंत्र्याचे रक्षण करणे; सागरी गुन्हेगारीपासून सुरक्षा पुरविणे; पर्यावरणाचे रक्षण करणे, समुद्रमार्गावरील प्रवासी व मच्छिमारांचे रक्षण करणे इत्यादी बाबींचा समावेश सागरी सुरक्षा या संकल्पनेत होतो. थोडक्यात 'सागरी सुरक्षा' ¼Maritime security½हा राष्ट्रीय सुरक्षेचाच एक अविभाज्य भाग आहे.

**आव्हाने:**

भारताला सुमारे ७५०० कि.मी.चा सागरी किनारा आहे. या सागरी सीमेच्या रक्षणाची जबाबदारी दोन प्रमुख संस्थावर अवलंबून आहे. यात भारतीय नौदल ¼Indian Navy½ आणि भारतीय तट रक्षक दल (Indian Coast Guard) यांचा समावेश होतो. सध्या भारतीय नौदलात सुमारे ५८००० पेक्षा जास्त सैनिक व आधिकारी आहेत. तथापि भारताच्या सागरी किनाऱ्याच्या प्रमाणात ही संख्या खुपच मर्यादित आहे. त्यामुळे नौदलाच्या मदतीला १९७८ साली भारतीय तट रक्षक दलाची स्थापना करण्यात आली. तथपि, बदलत्या आंतरराष्ट्रीय राजकीय परिस्थितीमध्ये नौदल आणि तट रक्षक दलांच्या संरक्षणाच्या क्षमतेवर मर्यादा आहेत. त्यामुळे भारताची सागरी सीमा आज जास्त असुरक्षीत बनली आहे.

आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार United Nations Convention on the Law of the Sea भौगोलिक सीमेपासून १२ Nautical Mile पर्यंत संबंधीत राज्याची समुद्री सीमा ग्राहय मानली जाते. तसेच भौगोलिक सीमेपासून ३५० Nautical Miles (६४८कि.मी.) त्या राज्याचा Exclusive Economic Zone (EEZ) असतो. या क्षेत्रातील मासेमारी, तेलसाठे, खणीज संपत्ती, यावर संबंधीत राज्याचा ताबा असतो. यावरून हे लक्षात येते की भारताला किती मोठया सागरी क्षेत्राच्या रक्षणाची जबाबदारी आहे. सहाजिकच एवढया विशाल समुद्री भागावर नियंत्रण ठेवण्यासाठी सक्षम व व्यापक संरक्षण यंत्रणेची गरज आहे. साधारणत: भारतीय सागरी सुरक्षे समोरील आव्हानांची चर्चा पुढील मुद्यांच्या आधारे करता येईल.

अ) दहशतवाद: १९९३ मधील मुंबई साखळी बॉबस्फोट व २६ नोंव्हेबर २००८ मधील मुंबईवरील दहशतवादी हमला या घटना आपल्या सागरी सुरक्षेतील मर्यादांचा परिणाम होता. या घटना घडल्या नंतर सागरी सुरक्षा आधिक सक्षम केली पाहिजे यावर प्रशासकीय, लष्करी आणि राजकीय पातळीवर मोठया प्रमाणात चर्चा झाली, परंतु प्रत्याक्षात खुपच कमी कार्यवाही करण्यात आली. त्यावेळी नौदल आणि तट रक्षक दलाच्या बजेटमध्ये वाढ करावी. या दलांच्या मनुष्यबळामध्ये आणि तंत्रज्ञानामध्ये सुधारणा करण्यात यावी अशा प्रकारची शिफारस करण्यात आली. तथापी प्रत्यक्षात खुप तुटपुंज्या स्वरूपाची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे पुन्हा अशा दहशतवादी घटनांची शक्यता नाकारता येत नाही.

१२ जानेवारी २०१८ रोजी केरळमधील मुनांबम बंदरावरून २४३ लोक मासेमारी करणाऱ्या बोटीतून अचानक बेकायदेशीरपणे निघून गेल्यावर दुसऱ्या दिवशी संपूर्ण यंत्रणा खडबडून जागी झाली. अद्याप ती बोट कोठे गेली याचा तपास लागू शकलेला नाही. यात कांही महीला व बालकांचा समावेश असल्याची माहीती मिळाली आहे. ही घटना आपल्या सागरी सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते.

ब) आर्थिक क्षेत्राचे संरक्षण: भारताचे आर्थिक समुद्री क्षेत्र, अर्थात Exclusive Economic Zone सुमारे २ मिलीयन स्के.कि.मी.व्याप्तीचे आहे. या क्षेत्रातील मासेमारी, भुगार्भातील खनीज संपत्ती, तेल साठे यावर पुर्णत: भारताची मालकी आहे. या आर्थिक क्षेत्रातील (EEZ) व्यवसायांना संरक्षण पुरविणे जोखमीचे काम आहे. याशिवाय चेचेगिरीचा प्रश्न आपल्या संरक्षणदला समोरील मोठे आव्हान आहे. तेल उत्खनन आणि इतर नैसर्गिक साधनसंपत्तीच्या समुद्री वाहतूकीला चेच्यापासून धोका असतो. त्यांना संरक्षण दिल्याखेरीज आपण EEZ चा उपयोग करू शकणार नाही.

क) सागरी सीमांबद्दल वाद: ज्याप्रमाणे भारत –पाक यांच्यात भौगोलिक सीमेबद्दल वाद आहेत त्याचप्रमाणे सागरी सीमेबद्दल देखील वाद आहेत. अनेकदा भारतीय मच्छिमारांना पाकिस्तानच्या सीमेत प्रवेश केल्याबद्दल अटक केली जाते. त्याचप्रमाणे पाकिस्तानी मच्छिमारांनादेखील भारतीय सीमेत बेकायदेशीर प्रवेश केल्याच्या कारणावरून अटक होत असते. हा सीमा प्रश्न भारत–श्रीलंका भारत–बांगला देश यांच्या संदर्भात देखील आहे.

ड) सागरी सुरक्षेची वाढती वरदळ: दररोज सागरी मार्गे अनेक प्रकारच्या वाहतूकीची दाट वरदळ असते. प्रवासी वाहतूक करणाऱ्या बोटी, माल वाहतूक करणारी जहाजे, तेलाची वाहतूक करणारी जहाजे, मासेमारी करणाऱ्या बोटी, लष्करी बोटी आणि तट रक्षक दलांच्या बोटी व पाणबुडया यांची दैनंदिन वाहतूक सागरी मार्गाने होत असते. या वाढत्या वाहतूकीमध्ये शत्रुराष्ट्राची किंवा दहशतवादाची नेमकी ओळख लक्षात होणे कठिण जाते. त्याप्रमाणे बेकायदेशीरपणे होणारी घुसखोरी आणि बांगलादेश व श्रीलंकेतून येणारे निर्वासीत यांचा प्रश्न देखील गंभीर स्वरूपाचा आहे.

इ) समन्वयाचा प्रश्न : भारताच्या सागरी किनाऱ्यावर केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध खात्यांचे नियंत्रण असते सध्या यात १२ विविध मंत्रालयांचा समावेश आहे. उदा. जहाज वहातूक मंत्रालय, महामार्ग वाहतूक मंत्रालय, कृषी मंत्रालय (मासेमारी विभाग), संरक्षण मंत्रालय, तट रक्षक दल इ. या सर्व खात्यांच्या व सीमेवरील संबंधीत राज्याच्या कायद्यानुसार प्रत्येक विभाग काम करत असतो.अशावेळी समन्वयाचा प्रश्न आधिक जटील बनतो. त्यामुळे सागरी सुरक्षेला कोण जबाबदार हे निश्चित सांगता येत नाही.

यावर उपाय म्हणून गत वर्षी राष्ट्रीय सागरी सुरक्षा समन्वयक (National Maritime Security Coordinator ) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हा निर्णय स्वागतार्ह आहे. विविध संस्थामध्ये समन्वय असल्याशिवाय सागरी सुरक्षा करता येणार नाही.

फ) चीनच्या सागरी आक्रमणाचा धोका: व्यापाराच्या नावाखाली गेल्या तीन दशकात चीनने भारताच्या सभोवताली अनेक बंदरांचा विकास सुरू केला आहे. बंगालचा उपसागर, हिन्दी महासागर आणि अरबी समुद्र अशा तिन्ही बाजूंनी चीनने आपले सागरीतळ निर्माण केले आहेत. या साखळीला 'String of Pearls' या नावाने ओळखले जाते. दक्षिण चीनपासून सुदान पर्यंत अनेक सागरीतळ चीनने निर्माण केले आहेत. निर्जन बेटे ताब्यात घेणे बंदर विकासाच्या नावाखाली भाडेपटीवर बेट ताब्यात घेणे आणि व्यापारी उपयोगाचे कारण सांगत लष्करी कारणासाठी या बंदराचा वापर करणे ही चीनची रणणीती आहे. एखाद्या बंदराच्या स्वामित्वामुळे त्या बंदराच्या ३५० Nautical Mile पर्यंत चीनला आपला हक्क सांगता येतो. या चीनच्या आक्रमक प्रवृत्तीला तोंड देण्यासाठी भारताला दिर्घकालीन योजना तयार करावी लागेल. सध्या एकूण लष्करी खर्चाच्या जेमतेम १६ टक्के नौदलावर खर्च होते. हा आकडा भारताच्या सागरी सुरक्षेची आवस्था किती बिकट आहे हे स्पष्ट करतो. भारताचे

सागरी क्षेत्र भारताच्या भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे २/३ आहे. त्याप्रमाणात नौदलावर पैसा खर्च होत नाही.

**समारोप :**

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, सागरी सुरक्षा भारताच्या Ðष्टिकोनातून अत्यंत महत्वाची बाब आहे. केंद्र शासन या गोष्टीकडे कितपत गांभीर्याने पाहते आणि दिर्घकालीन उद्दिष्टे डोळयासमोर ठेवुन रणनीती तयार करते यावर देशाची सुरक्षा अवलंबून आहे. हा केवळ देशाच्या राजकीय सुरक्षेशी निगडीत मुद्दा नाही. देशाची आर्थिक सुरक्षा देखील सागरी सुरक्षेशी निगडीत आहे. त्यामुळे सागरी सुरक्षेच्या Ðष्टिकोनातून देशाने पुढील पावले उचलने आवश्यक आहे.

अंदाजपत्रकात संरक्षणासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणे. विशेषत:नौदल व तटरक्षक दलासाठी खास तरतूद आवश्यक

सागरी किनाऱ्याशी संबंधीत सर्व मंत्रालयामध्ये समन्वय करण्यासाठी कालबाहय कायदे रद्द करून प्रस्थापित कायद्यामध्ये सुसुत्रता आणणे, जेणेकरून सागरी सुरक्षेची जबाबदारी निश्चित करता येईल.

दहशतवादी कृत्यांना सक्षमपणे तोंड देण्यासाठी अंतर्गत गुप्तहेर यंत्रणेच्या धर्तीवर सागरी गुप्तहेर यंत्रणा तयार करणे.

शेजारील राष्ट्रांच्या व्युव्हरचनात्मक धोरणांना प्रत्यूत्तर देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावेत. थोडक्यात आगामी काळात सागरी सुरक्षा भारताच्या संरक्षण मंत्रालयासमोरील महत्त्वाचा विषय असणार आहे.

***संदर्भसूची***


- Pushpita Das, *Costal Security The Indian Experience*, IDSA, Sept-2013
- www.ispa.in.monographs
- The Hindu, 13 Jan, 2018 online copy
- प्रताप दिघावकर, *सागरी सुरक्षा यंत्रणा उथळ,* लोकसत्ता, दि.१६ ऑगस्ट२०१५
- सागरी सुरक्षा राम भरोसे, लोकमत, दि.२०नोव्हे२०१५
- सी.राजा मोहन, चीनचे वाढते सागरी आव्हान, दै.लोकसत्ता दि.२५ एप्रिल २०१३